CNR No. MHSI01-000422-2014

## निशाणी १५१ खालील आदेश

अपेलंट यांनी अपेलंट नं. ५ यांचे विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जावर रिस्पॉडंट यांनी म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे. अपेलंट व रिस्पॉडंट यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अपेलंटचे अर्जामध्ये कथन की, अपेलंट नं. ५, साजुराम गंगाराम देसाई हे दिनांक १८/११/२०२२ रोजी मौजे कोलझर, ता. दोडामार्ग येथे मरण पावलेले आहेत. त्यांना अर्जदार नं. ५अ व ५ब हे वारस आहेत. याशिवाय दुसरे वारस नाहीत. सदर अपिल प्रलंबित असताना अपेलंट यांना त्यांच्या मृत्यूची कल्पना नव्हती त्यामुळे माहिती झाल्यानंतर लगेच वारसाचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्ज दाखल करण्यास ४ महिने १५ दिवस एवढा विलंब झालेला आहे. तो विलंब जाणूनबूजून केलेला नाही. सबब वेळेत वारस रेकॉर्डवर न आणल्यामुळे अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. तरी झालेला आदेश रद्द करून मिळावा.

३. रिस्पॉडंट यांनी अर्जावर म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे की, अर्जास योग्य कारण नाही त्यामुळे तो चालण्यास पात्र नसल्यामुळे तो अर्ज नामंजूर करावा.

४. अपेलंट यांचा अर्ज, त्यावरील रिस्पॉंडंट यांचे म्हणणे याचा विचार करता अपेलंट यांनी अपेलंट नं. ५ यांचे वारस वेळेत अपिलमध्ये समाविष्ट केलेले नाहीत. त्यामुळे अपेलंट नं. ५ विरूध्द अपिल हे अबेट झालेले आहे. सबब अर्जातील कथनांचा विचार करता दिलेले कारण योग्य आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अपेलंट यांचा निशाणी १५१ वरील अर्ज हा मंजूर करण्यात येत आहे.

२. अपेलंट नं. ५ विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR

Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2025.09.09 16:49:13 +0530

सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक– ०९/०९/२०२५

( श्री. एस. एस. इंदलकर )
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.